दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ : मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ २५**

# भिलाई-दुर्ग मेगाब्लॉकमुळे वीजनिर्मितीत व्यत्यय येण्याची शक्यता

**मुंबई, दि. १९ :-** साऊथ ईस्ट मध्य रेल्वेने २२ जून ते २५ जून, २००९ या कालावधीत भिलाई-विलासपूर मार्गावर मेगाब्लॉक प्रस्तावित केला आहे. त्यामुळे महानिर्मितीच्या कोराडी आणि खापरखेडा या वीजनिर्मिती केंद्रातून होणाऱ्या वीजनिर्मितीवर या कालावधीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

महानिर्मितीच्या कोराडी व खापरखेडा या वीजकेंद्रांना लागणाऱ्या कोळशापैंकी अनुक्रमे ९०% व ६२% कोळसा हा एकत्रितपणे एम.सी.एल. (महानदी कोलफिल्ड लिमिटेड), तसेच एस.ई.सी.एल. (साऊथ ईस्ट कोलफिल्ड लिमिटेड) तर्फे पुरवला जातो. यापैकी एम.सी.एल चा कोळसा संबलपूर-रायपूर-भिलाई दुर्ग या मार्गाने तर एस.ई.सी.एल. चा कोळसा कोरबा-रायपूर-भिलाई दुर्ग या मार्गाने रेल्वे वॅगनद्वारे नागपूरपर्यंत आणला जात असतो.

साऊथ ईस्ट मध्य रेल्वेच्या या प्रस्तावित मेगाब्लॉकसंदर्भात महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार यांनी दक्षिण-पूर्व मध्ये रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांची नागपूर येथे दि. १७ जून २००९ रोजी भेट घेतली. महानिर्मितीने रेल्वेच्या संबंधित कार्यालयाशी यासंदर्भात संपर्क साधून मेगाब्लॉकच्या आधी एकत्रितपणे कोराडीसाठी प्रतिदिन किमान ४ कोळशाच्या रेक्स तर खापरखेडासाठी प्रतिदिन किमान ६ कोळशाच्या रेक्स वाहून आणण्यासाठी विनंती केली आहे. सदर कोळसा वॅगनमधून उतरविण्याच्या प्रक्रियेत गतिमानता आणली जाईल, हेही महानिर्मितीने स्पष्ट केले आहे. सध्या कोराडी - खापरखेडा केंद्रांकडे जेमतेम २-३ दिवस पुरेल इतकाच कोळशाचा साठा असल्याने महानिर्मितीने रेल्वेला ही विनंती केली आहे.

अशा आपत्कालीन परिस्थितीत पर्यायी व्यवस्थेचा भाग म्हणून वेस्टर्न कोलफिल्डस् लिमिटेड या अन्य कोळसा पुरवठा कंपनीकडून जादा कोळशाचा पुरवठा व्हावा, यासाठी महानिर्मितीने सदर कंपनीलाही विनंती केली आहे. नागपूरजवळील सावनेर-डुबरी खुर्द येथून हा कोळसा उपलब्ध होण्यासारखा आहे. इंधन कोळशाच्या अभावी वीजनिर्मितीत कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी महानिर्मिती सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

---

प्रति,
**माननीय संपादक ,**
दैनिक

दिनांक : १९.०६.२००९

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**